# वसई विरार शहर महानगरपालिका

**जमा व खर्चाचे सन 2022-23 सुधारित व सन 2023-24 चे मूळ अंदाजाबाबत मा.आयुक्त यांचे निवेदन/अर्थसंकल्पीय भाषण**

**मा. प्रशासक महोदय,**

वसई विरार शहर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 95 अन्वये मी सन 2022-23 या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित अंदाज व सन 2023-24 या वर्षाचे मुळ अंदाज तयार केले असून मनपा अधिनियमाचे कलम 96 ते कलम 100 नुसार खालील प्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाज मा. प्रशासक यांच्या मंजुरीसाठी सविनय सादर करत आहे.

## अर्थसंकल्पीय गोषवारा

(रु. लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा. प्रशासक यांनी स्विकृत केलेल्या रकमा सन 2022-23 मुळ अंदाज | सुधारित अंदाजपत्रक 2022-23 | मुळ अर्थसंकल्प 2023-24 मा. आयुक्त |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रारंभिक शिल्लक | 71595.33 | 109760.94 | 85660.12 |
| 2 | महसुली जमा | 123385.00 | 122400.23 | 133141.41 |
| 3 | भांडवली जमा | 17229.58 | 14847.81 | 36619.57 |
| 4 | असाधारण व ऋण निलंबन जमा | 23257.12 | 19078.90 | 22660.07 |
| 5 | एकत्रित जमा रकमा | 163871.70 | 156326.94 | 192421.05 |
| 6 | प्रारंभिक शिल्लकेसह एकत्रित जमा रक्कम | 235467.03 | 266087.87 | 278081.17 |
| 7 | महसुली खर्च | 108468.77 | 102441.00 | 123744.36 |
| 8 | भांडवली खर्च | 105412.68 | 61748.08 | 132027.40 |
| 9 | असाधारण व ऋण निलंबन खर्च | 21442.83 | 17940.55 | 21807.77 |
| 10 | एकत्रित खर्च रकमा | 235324.28 | 182129.63 | 277579.53 |
| 11 | अखेर शिल्लक रकमा | 142.75 | 85660.12 | 501.64 |
| 12 | अखेरच्या शिलकेसह एकत्रित खर्च रक्कम | 235467.03 | 266087.87 | 278081.17 |

मा. प्रशासक महोदय, या अर्थसंकल्पाची मांडणी ही सद्यस्थितीत असलेल्या प्रत्यक्ष उत्पन्नाच्या आधारावर तयार करण्यात आलेली आहे. मागणी प्रमाणे आवश्यक महसुली खर्च करणे, सुरु असलेले प्रकल्प तसेच मागील वर्षी निधी अर्थसंकल्पीत झालेले प्रकल्प पुर्ण करण्यासाठी आवश्यक तरतुदींचा समावेश प्राधान्याने या अर्थसंकल्पात केला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका हे एम.एम.आर.डी.ए. कार्यक्षेत्रामधील एक वेगाने विकसित होणारे नागरी क्षेत्र आहे. शहराच्या नागरीकांना किमान नागरी सुविधा पुरविणे तसेच या बरोबर शहराचा सुनियोजीत विकास होणे या करीता शहरातील सर्व घटकांचे सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. या शहराच्या सुनियोजित विकासाबाबत महानगरपालिका आयुक्त म्हणून मी बांधील आहे. त्यासाठी तयार करण्यात आलेल्या अर्थसंकल्पामधील जमा व खर्चाच्या लेखाशिर्षनिहाय ठळक बाबींचा उल्लेख पुढील प्रमाणे.

1) अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ तसेच दरवाढ करण्यात आलेली नाही.
2) उत्पन्नवाढीसाठी विविध योजना हाती घेतल्या आहे.
3) मनपाच्या मालमत्तांचे व्यवस्थापनासाठी स्वतंत्र विभाग कार्यरत करण्यात आला आहे.
4) वसई विरार शहरास गार्डन सिटी असे संबोधण्यात यावे यासाठी उद्यान, तलाव व क्रिडांगणासाठी तरतुदीमध्ये भरीव वाढ करण्यात आली आहे.

# अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्टे

## * महानगरपालिकेच्या ठळक जमा बाबी *

- **मालमत्ता कर जमा :-** महानगरपालिका अधिनियम कलम 127 (1) अ अन्वये मालमत्ता कर हा सक्तिचा व प्रमुख उत्पन्नाचा स्त्रोत आहे. मालमत्ता कर संकलन विभागाकडे आजमितीस 9,26,091 इतक्या मिळकती आहेत. या मधील 7,80,363 मालमत्ता निवासी 1,36,728 इतक्या मालमत्ता अनिवासी आहेत. सदर मालमत्ता करामध्ये वाढ होण्याकरीता मनपा हद्दिमधील ज्या मालमत्तावर कर आकारणी झालेली नाही अशा मालमत्ता शोधुन मालमत्ता कर आकारणी करणेस प्राधान्य क्रम देण्यांत येत आहे. या शिवाय मालमत्ता कराची वसुली करण्याकरीता मालमत्ता कर विभागामार्फत विविध प्रकारच्या विशेष मोहिमा हाती घेण्यात येतात. यामध्ये कर भरणा करणे, वसुल गोळा होणे करीता कॅम्प तसेच घरोघरी जावून कर संकलन करणे या शिवाय जनजागृती करुन कर संकलनाचे उद्दिष्ट साध्य केले जात आहे. मालमत्ता कर, मोबाईलटॉवर वरील कर, उपभोक्ता कर, नोटीस फी, व्याज, शिक्षण कर रिबेट व रोजगार हमी कर रिबेट इत्यादी पासुन सन 2022-23 मध्ये सुधारीत अपेक्षित जमा रु 287 कोटी 76 लक्ष तसेच सन 2023-24 मध्ये रु 336 कोटी 57 लक्ष जमा अपेक्षित आहे.

- **स्थानिक संस्थाकर :-** स्थानिक संस्था कराबाबत कर दात्यांनी दाखल केलेली विवरणपत्र पडताळणी करुन थकीत जमा प्राप्त करुन घेणेची कार्यवाही सुरु असुन याद्वारे सन 2022-23 मध्ये 15 कोटी व सन 2023-24 मध्ये रु 15 कोटी जमा अपेक्षित आहे.

- **नगर रचना विभाग:-** नगररचना विभागाकडे इमारत विकास कामाच्या परवानग्यांची प्रकरणापासून विकास निधी, छाननी शुल्क प्रशमन आकार (Compounding Charges) अतिरिक्त चटई क्षेत्र याबाबींपासुन सन 2022-23 मध्ये रु 167 कोटी 03 लक्ष व सन 2023-24 मध्ये रु 171 कोटी 95 लक्ष इतकी जमा अपेक्षित आहे.

- **अग्निशमन सेवा जमा:-** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने उभ्या राहणाऱ्या इमारतींना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाय योजना अधिनियम 2006 अन्वये ना हरकत दाखले देण्यांत येतात याद्वारे अग्निमन सुरक्षा व विशेष अग्निसंरक्षण फी (कॅपीटेशन फी), वसुल केली जात असुन विशेष अग्निशमन उपकर मालमत्ता करासोबत वसुल केला जात आहे. प्रत्यक्ष अग्निशमन सेवा महानगरपालिका क्षेत्रात मोफत असुन महानरपालिकेच्या क्षेत्राबाहेर अग्निशमन सेवा पुरविण्यासाठी अग्निशमन फी आकारली जात आहे. अग्निशमन सेवेपासून सन 2022-23 मध्ये रु. 28 कोटी 10 लक्ष व सन 2023-24 मध्ये रु 33 कोटी 50 लक्ष जमा अपेक्षित आहे.

- **जाहिरात परवाना फी व जागा भाडे :-** वसई विरार शहर महानगरपालिकेचे प्रशासकीय ठराव क्र. 330 दिनांक 6/1/2021 अन्वये सुधारीत दरपत्रक मंजूर झालेले आहे त्यानुसार मनपा हद्दितील जाहिरात फी द्वारे सन 2022-23 मध्ये रु. 5 कोटी 5 लक्ष व सन 2023-24 मध्ये रु 6 कोटी 5 लक्ष जमा अपेक्षित आहे.

- **स्वच्छता कर जमा:-** मालमत्तेवरील सामान्य करासह आकारणी करुन वसुन केल्या जाणाऱ्या विशेष स्वच्छता करापासून सन 2022-23 मध्ये रु 24 कोटी 33 लक्ष व सन 2023-24 मध्ये 28 कोटी 20 लक्ष जमा अपेक्षित आहे.

- **पाणीपुरवठा सेवा जमा:-** विशेष पाणी पट्टी द्वारे सन 2022-23 मध्ये रु 65 कोटी व सन 2023-24 मध्ये 80 कोटी जमा अपेक्षित आहे. बांधकाम परवानगी देताना विकासकाकडून वसुल केल्या जाणाऱ्या

पाणीपुरवठा स्त्रोत विकास शुल्कापासून सन 2022-23 मध्ये रु 35 कोटी व सन 2023-24 मध्ये 45 कोटी जमा अपेक्षित आहे. मालमत्ता कराच्या संकलना करीता ज्या प्रमाणे विशेष मोहिम राबवल्या जात आहेत. तेच पाणी पट्टी करीता देखील करण्यात येत असून पाणी पट्टी संकलन केले जात आहे. या शिवाय व्यापारी व औद्योगिक नळ कनेक्शन सर्वेक्षण करून आकारणी करणे. तसेच अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करणे कामी अभय योजना लागू करणे प्रस्तावित आहे त्यामुळे उत्पन्न वाढ होईल तसेच

- **महसुली अनुदाने:-** वस्तु व सेवा कर अनुदान सन 2022-23 मध्ये रु. 415 कोटी 56 लक्ष व सन 2023-24 रु. 448 कोटी 80 लक्ष यासह मुद्रांक शुल्क अनुदान रस्ते दुरुस्तीसाठी वाचनालय अनुदान, अशा विविध स्वरुपाच्या अनुदानापोटी एकूण सन 2022-23 मध्ये रु. 481.75 कोटी व सन 2023-24 मध्ये रु 523.83 कोटी इतके अनुदान शासनाकडून अपेक्षित आहे.

- **इतर जमा:-** महानगरपालिकेच्या इतर उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेचे इतर उत्पनामध्ये समाविष्ट प्रयोग खेळावरील कर, पे & पार्क वाहनतळ व्यवस्था, नो पार्कींग मधील वाहने उचलणे, अतिक्रमण हटविणे व अनधिकृत बांधकाम तोडणे व प्रशासकिय शुल्क, जुन्या भंगाराच्या विक्रीचे जमा, निविदा इतर नगरपालिका प्रकाशनांचे जमा, रुग्णालय व इतर आस्थापनांच्या नोंदणीसाठी नाहरकत दाखला व दाखला नुतणीकरण फी, जन्म-मृत्य दाखला, विवाह नोंदणी फी इत्यादी बाबींपासून सन 2022-23 मध्ये रु. 48 कोटी 84 लक्ष व सन 2023-24 मध्ये रु. 55 कोटी 33 लक्ष इतके जमा अपेक्षित आहे.

- **भांडवली अनुदाने:-** 15 वा वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा, एअर क्वालिटी या करीता अनुदान, त्याच प्रमाणे अमृत पाणी पुरवठा योजना, स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी), दलित वस्ती अनुदाने या अशा विविध स्वरुपात अनुदाना पोटी महानगरपालिकेस सन 2022-23 मध्ये रु 112 कोटी 47 लक्ष व सन 2023-24 रु 320 कोटी 19 लक्ष जमा अपेक्षित आहे

# * महानगरपालिकेच्या ठळक खर्च बाबी *

- **आस्थापना खर्च:-** महानगरपालिकेच्या विस्तीर्ण कार्यक्षेत्रचा विचार करता आवश्यक सुविधा पुरवणेसाठी प्रशासकीय, तांत्रिक, अन्य सेवा पुरविण्यासाठी मंजूर आकृती बंधानुसार महानगरपालिका आस्थापनावर मंजुर असलेली सर्व पदे भरलेली नाही. आस्थापनेवरील आकृती बंधानुसार सद्यस्थितीत रिक्त असलेली पदे अभिकर्ता नेमून महानगरपालिकेच्या सर्व सेवा पुरवित आहे. महानगरपालिकेत रिक्त पदावरील कायम कर्मचारी भरती प्रक्रीया राबविण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्यानुसार या वर्षी भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून त्याकरिता पुरेसी तरतुद करण्यात आली आहे. स्थायी, अस्थायी व ठेका कर्मचारीसह आस्थापना खर्च हा सन 2022-23 मध्ये 289 कोटी 70 लक्ष अपेक्षित आहे. तर सन 2023-24 या वित्तीस वर्षात 391 कोटी 7 लक्ष अपेक्षित आहे. महानगरपालिकेचा सन 2022-23 चा आस्थापना खर्च 34.74 असुन तो अपेक्षित 35 % रकमेच्या मर्यादेत आहे.

- **नगर रचना:-** सन 2022-23 या वित्तीय वर्षात केंद्र शासनाच्या ऑनलाईन इमारती बांधकाम परवाना योजने अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेची निवड झालेली आहे. सबब याकामी ऑटो डी.सी. आर प्रोग्राम तयार करणे व त्या संबंधित कामे एजन्सी मार्फत करावयाची प्रक्रिया लवकरच करण्यात येणार आहे. जी. आय. एस. मॅपींग /लॅण्ड युज अपडेशन, ऑटो डी.सी. आर, सि. आर झेड. सर्व्हे, आकस्मिक खर्च इत्यादी बाबींसाठी सन 2022-23 मध्ये रु 9 कोटी 6 लक्ष व सन 2023-24 मधे रु 21 कोटी 5 लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

- **पथदिप व विद्युत व्यवस्था:-** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रिय महामार्गावरील सातिवली फाटा, वसई फाटा, विरार फाटा व नायगाव फाटा पासुन शहरात येणाऱ्या मुख्य रस्त्यावर तसेच शहरातील वैतरणा स्टेशन, म्हाडा संकुल, विरार ते नालासोपारा या अंतर्गत मुख्य रस्त्यांवर दुभाजकामध्ये नविन सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणेकरिता सुमारे 1050 नग आकर्षक ऑक्टोग्नल पोल व 1850 नग एल.ई.डी दिवे बसविणेकरिता 8 कोटी रक्कमेची तसेच, शहरातील अंतर्गत रस्त्यावर सुमारे 900 नग पोल व 1700 नग एल.ई.डी दिवे बसविणे कामी 10 कोटी खर्च अपेक्षित असून कामे प्रगतीपथावर आहेत. सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेतील सुमारे 49,855 नग अपारंपिक सोडियम दिवे बदलुन नविन एल.ई.डी दिवे बसविणेचे काम प्रस्तावित असून लवकरच निविदा प्रक्रिया राबवुन एल.ई.डी दिवे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे वीज देयकात होणाऱ्या 40 ते 45% वीज बचती मधुन सदर प्रकल्पाची भांडवली गुंतवणूक 3 ते 4 वर्षात वसुल होऊन त्यापुढे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. याकरिता सुमारे 66 कोटी खर्च होणार आहे. महानगरपालकिने अपारंपारिक उर्जा स्त्रोत निर्मितीवर भर देऊन 1) बेघर रात्र निवारा केंद्र, बेलीचा पाडा 2) फुलपाडा डॅम, तरण तलाव इमारत या ठिकाणी 10 कि.वॅट क्षमतेचे सोलार यंत्रणा व सोलार वॉटर हिटर तसेच, सार्वजनिक तलाव व उद्यानामध्ये सुमारे 62 सोलार स्ट्रीट लाईट बसविले आहेत. त्याकरिता सुमारे 40 लक्ष खर्च होणार आहे. सन 2023-24 या वित्तीय वर्षात दिवाबत्ती व्यवस्था 20% मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखाशिर्षांतर्गत आदिवासी पाडयांवर सुमारे 50 लक्ष खर्चाचे सोलार स्ट्रीट लाईट प्रस्तावित करण्यात आले आहे.

- **अग्निशमन:-** महानगरपालिकेची अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाची मुख्य अग्निशम केंद्र आचोळे सह एकुण सात अग्निशमन केंद्र आहेत याद्वारे महानगरपालिका लगतच्या क्षेत्रामध्ये अग्निशमन व बचाव कार्य करण्यात येते. महानगरपालिकेची अग्निशमन यंत्रणा आधुनिक तसेच सक्षम करण्यावर भर देण्यात येत असून या करीता सन 2022-23 मध्ये रु 22 कोटी 41 लक्ष व सन 2023-24 मध्ये रु 114 कोटी 45 लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

- **आपत्ती व्यवस्थापन:**- सन 2022-23 मध्ये रु 4 कोटी 11 लक्ष व सन 2023-24 मध्ये रु 7 कोटी 94 लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

- **शहर स्वच्छता घनकचरा व्यवस्थापन:**- महानगरपालिका शहरात निर्माण होणारा कचरा महानगर पालिकेच्या मालकीच्या गोखिवरे क्षेपणभुमीवर टाकण्यात येतो. सदर घनकचरा स्थलांतरीत करणेकामी महानगरपालिकेने स्वत:च्या मालकीची यंत्र सामुग्री खरेदी केली आहे. तसचे दैनंदिन गटार सफाई यांत्रिक पध्दतीने करणेकामी सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करण्यात आल्या आहेत. या शिवाय क्षेपणभुमीवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे करीता घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत MRF (Materials Recover Facility), C & D वेस्ट, ग्रीन वेस्ट तसेच बायोगॅस प्रकल्प राबविण्यात येणार आहे. दैनंदिन साफसफाई, डास निर्मुलन सह सार्वजनिक स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन यावर सन 2022-23 रु 214 कोटी 46 लक्ष व सन 2023-24 रू 244 कोटी 30 लक्ष तरतूद आहे.

- **रुग्णालयीन सेवा (वैद्यकिय आरोग्य):**- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची 2 रुग्णालये, 3 माताबाल संगोपन केंद्रे, 21 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व 3 दवाखाने कार्यरत असून यांच्या मार्फत नागरीकांना आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. महानगरपालिका हद्दीतील वाढती लोकसंख्या पाहता ही केंद्र आणि रुग्णालये अपुरी पडत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेने एका बाजूला बहुउद्देशिय रुग्णालयाच्या उभारणीचे काम हाती घेतले असून दुसरीकडे प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढवण्याचाही निर्णय घेतला आहे. वैद्यकिय आरोग्य सेवा सक्षमीकरणाचे काम हाती घेण्यांत आले असून गरोदर माता आरोग्य तपासणी, टेली कन्सल्टेशन, लसीकरण, आरोग्यबाबत जनजागृती, रुग्णांची प्राथमिक तपासणी(ओपीडी), मोफत औषधे, तपासणी, रक्त चाचणी अशा विविध उपायोजना करीता भरीव आर्थिक तरतूदी करण्यात आल्या आहेत. एकुण रुग्णालय व्यवस्थापनासाठी सन 2022-23 मध्ये रु 49 कोटी 24 लक्ष व सन 2023-24 मध्ये रु 113 कोटी 82 लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे. सदर तरतुदी मधील वाढ 100 टक्के पेक्षा जास्त आहे.

- **दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजना:**- दिव्यांग कल्याणकरीता असलेला विविध योजना अंतर्गत दिव्यांगाची असलेल्या टक्केवारी नुसार प्रतीमहा अनुदान, तसेच व्यवसाय कर्ज देणे, दिव्यांग खेळाडुंना प्रोत्साहन अनुदाने, आजारी व्याधीग्रस्त दिव्यांगाना आर्थिक अर्थसहाय्य, संस्थांना अनुदान तसेच भौतिकोपचारी साधन, दिव्यांग मेळावे, या करीता विविध योजनांमधून सन 2020-21 मध्ये 4 कोटी 53 लक्ष इतका लाभ देण्यांत आला आहे. व सन 2022-23 मध्ये रु 10 कोटी 32 लक्ष व 2023-24 मध्ये 11 कोटी 10 लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

- **महिला बालकल्याण कार्यक्रम:**- महिला बालकल्याणसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने मंजूर कामाच्या विविध योजना प्रभावी पणे राबविण्यांत येत असून या विविध योजना करीता सन 2022-23 मध्ये रु 16 कोटी 31 लक्ष व सन 2023-24 रु 21 कोटी 67 लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

- **मागासवर्गीय कल्याणकारी योजना व पी बजेट:**- दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अधिक अनुदान उपलब्ध करुन घेऊन सदर वसाहतीमध्ये सर्व सार्वजनिक सुविधा उपलब्ध करणे. दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी घरकुल योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजनांतर्गत विकास कामे, विशेषत: नविन शहरी विभागात वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देणे, कमी उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी आपत्कालीन केंद्रासाठी सहाय्य करणारे दुर्बल घटकांतील मच्छीमार बांधवांसाठीच्या सोयी सुविधा तसेच इतर मागासप्रवर्गातील भागातील रस्ते, गटार, दिवाबत्ती इ. समाजमंदिर, या सार्वजनिक सुविधांसह घ्यावयाच्या

योजनांसाठी राखीव तरतुदीसह सन 2022-23 मध्ये रु. 22 कोटी 67 लक्ष व सन 2023-24 मध्ये 26 कोटी 93 लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

- **परिवहन सेवा:-** परिवहन उपक्रमासाठी यशवंत नगर येथे परिवहन भवनाचे बांधकाम चालू आहे. या वर्षात काही मार्गावर महानगरपालिकेची ई बस सेवा सुरु करण्याचा मानस आहे. त्या अनुषंगाने बस खरेदी व परिवहन भवन बांधकाम यासाठी मुख्य निधी कडून परिवहन उपक्रमास सन 2022-23 मध्ये रु. 80 कोटी व सन 2023-24 मध्ये अनुक्रमे रू 42 कोटी तरतुद आहे.

- **बांधकाम व्यवस्था:-** बांधकाम विभागामार्फत नियमित होणाऱ्या विकासकामाच्या बाबींवर योग्य व पुरेशा तरतुदी करण्यात आलेल्या आहेत, शहर सौंदर्यीकरण, चौक, वाहतूक बेट, समाजमंदिर, नाट्यगृह, मार्केट, स्मशानभूमी व्यवस्थापन, तलाव सुशोभिकरण, फुटपाथ शहरांतर्गत उड्डाणपुले या करीता विकास कामावरील लेखाशिर्षात योग्य त्या अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आलेल्या आहे. सन 2022-23 मध्ये रु 522 कोटी 34 लक्ष व सन 2023-24 रु 814 कोटी 44 लक्ष इतकी तरतुद यासाठी प्रस्तावित आहे.

- **उद्यान:-** महानगरपालिका क्षेत्रामधील प्रत्येक प्रभागामध्ये असलेल्या उद्यानांचा विकास करणे या मध्ये आधुनिक पद्धतीचे जॉगर्स ट्रॅक, लहान मुलांची खेळणी, क्रिडा साहित्य, बैठक व्यवस्था करणे, उद्यान देखभाल तसेच दुरुस्ती करणे खर्च प्रस्तावित आहे. सन 2022-23 मध्ये रु 4 कोटी 63 लक्ष व सन 2023-24 रु 40 कोटी 50 लक्ष इतकी तरतुद यासाठी प्रस्तावित असून ज्या प्रयोजनासाठी तरतूद उपलब्ध होईल त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात येत आहे.

- **वृक्ष आणि पर्यावरण:-** सन 2022-23 मध्ये रु 13 कोटी 59 लक्ष व सन 2023-24 रु 27 कोटी 56 लक्ष इतकी तरतुद यासाठी प्रस्तावित असून ज्या प्रयोजनासाठी तरतुद उपलब्ध होईल त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात येत आहे.

- **तलाव सुशोभिकरण:-** शहरामधील असलेले विविध तलावाचे पुर्नजिविकरण व सुशोभिकरण करणे यावर भर दिला असून शासनाकडील अनुदानासह 64 कोटी इतकी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

- **जलतरण तलाव:-** नविन जलतरण तलाव बांधणे व अस्तित्वातील जलतरण तलावांचे देखभालीसाठी सन 2022-23 मध्ये रु 1 कोटी 61 लक्ष व सन 2023-24 रु 2 कोटी इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

- **क्रिडा व क्रिडा विषयक कार्यक्रम:-** प्रभागातील शालेय कला क्रिडा महोत्सव, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राविण्य मिळविणाऱ्या खेडाळूना प्रोत्साहन रक्कम देणे, महापौर मॅरेथॉन स्पर्धा व इतर क्रिडा विभागाच्या विविध योजना करीता सन 2022-23 मध्ये रु 27 कोटी 46 लक्ष व सन 2023-24 रु 62 कोटी 26 लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.
- **नालेखोदाई पुरप्रतिबंधक कामे:-** या अंतर्गत विकासविषयक कामांसाठी रु 10 कोटी तरतुद प्रस्तावित आहे. तसेच पावसाळयापूर्वी यांत्रिक साहित्याव्दारे नाले खोदाई करणेकामी सन 2022-23 रु 27 कोटी 57 लक्ष व सन 2023-24 मध्ये 25 कोटी इतकी स्वतंत्र तरतुद प्रस्तावित आहे.

- **पाणीपुरवठा व्यवस्था:-** सद्या शहराच्या सुर्या 1 व 3, उसगांव, पेल्हार या योजनामधून पाणी पुरवठा होतो. अमृत योजने अंतर्गत शहरात जलवाहिनी अंथरणे आणि जलकुंभ बांधण्याचे काम सुरु आहेत. MMRDA अनुदानासह महापालिकेच्या खर्चातून कामे करण्यात येणार आहेत. पाणी पुरवठा करणे व देखभाल दुरुस्ती यासह सन 2022-23 मध्ये रु. 209 कोटी 34 लक्ष इतकी तरतुद असून सन 2023-24 मध्ये रु 313 कोटी 62 लक्ष दतकी तरतुद प्रस्तावित आहे.

**आभार,**

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. पालघर जिल्हा पालकमंत्री, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मा. खासदार, मा. आमदार यांनी महानगरपालिकेस वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. तसेच मा. माजी महापौर, मा. माजी उपमहापौर मा. माजी स्थायी समिती सभापती यांच्या वेळोवेळीच्या सुचना व सन्मा. माजी गटनेते, सन्मा. माजी सर्व प्रभाग समिती सभापती, सन्मा. माजी सदस्य, सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी तसेच सर्व सन्मा. नागरीक यांचे सहकार्याबद्दल मनपुर्वक आभार व्यक्त करतो. वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभार व्यक्त करतो.

सन 2022-23 च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन 2023-24 चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक "अ", महानगरपालिकेच्या "अ" अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, दिव्यांग कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, "ब" अंदाजपत्रकाकडे परिवहन सेवेकरीता वर्ग करावयाच्या अशंदानाचे अंदाज, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक "क", वृक्ष निधी अंदाजपत्रक, योजना विशेष निधीचे अदांजपत्रक, बांधकाम/ पाणीपुरवठा कामांची यादी, आस्थापना तक्ता इ. इतर आवश्यक सहपत्रे सोबत जोडली आहेत.

मा. प्रशासक महोदय, अशाप्रकारे वसई विरार शहरास "गार्डनसिटी" बनविण्याचा संकल्प असलेला व त्यासाठी आवश्यक तरतुदी अर्थसंकल्पीत केलेला सन 2022-23 चा सुधारीत रु. 2660.87 कोटी व सन 2023-24 चा मुळ रु. 2780.81 कोटीचा अर्थसंकल्प मंजुरीस्तव सविनय सादर.

धन्यवाद ! जय हिंद !!

दिनांक

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# जमेच्या ठळक बाबी

(आकडे लाखात)

| अ.क्र. | जमा लेखाशिर्ष | प्रत्यक्ष रकमा 2021-22 | सुधारीत अर्थसंकल्प 2022-23 | मुळ अंदाज 2023-24 |
|---|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर जमा | 23757.36 | 28776.71 | 33657.02 |
| 2 | स्थानिक संस्था कर जमा | 1031.57 | 1531.61 | 1512.10 |
| 3 | जाहिरात परवाना फी व जागा/भुई भाडे जमा | 255.80 | 505.50 | 605.50 |
| 4 | सांस्कृतिक भवन/समाज मंदिर | 33.92 | 122.50 | 152.00 |
| 5 | अग्निशमन सेवा जमा | 2181.18 | 2810.29 | 3350.00 |
| 6 | नगररचना जमा | 19686.55 | 16703.10 | 17195.70 |
| 7 | वाचनालय जमा रकमा | 13.03 | 22.28 | 22.24 |
| 8 | रुग्णालय सेवा जमा | 55.09 | 112.20 | 227.20 |
| 9 | तलाव उत्पन्न | 22.16 | 100.00 | 100.01 |
| 10 | स्वच्छता सेवा जमा | 2498.85 | 2942.47 | 3475.00 |
| 11 | पाणी पुरवठा सेवा जमा | 13342.01 | 22151.70 | 41034.60 |
| 12 | इतर जमा | 3226.27 | 4884.59 | 5533.58 |
| 13 | किरकोळ जमा | 40.78 | 1259.24 | 1219.76 |
| 14 | आपत्ती व्यवस्थापन जमा | 0.00 | 0.00 | 0.01 |
| 15 | विकास कामे जमा रकमा | 2337.49 | 6433.43 | 8440.80 |
| 16 | सर्वसाधारण अनुदाने | 42248.65 | 48175.71 | 52383.46 |
| 17 | इतर असाधारण जमा | 18186.24 | 19078.90 | 22660.07 |
| 18 | वृक्ष प्राधिकरण जमा | 641.54 | 716.71 | 852.00 |
| | **एकूण जमा** | **129558.50** | **156326.94** | **192421.05** |
| | **प्रारंभिक शिल्लक** | 86116.82 | 109760.94 | 85660.12 |
| | **प्रारंभिक शिल्लकसह एकूण जमा** | **215675.32** | **266087.87** | **278081.17** |

# खर्चाच्या ठळक बाबी

(आकडे लाखात)

| अ.क्र. | खर्च लेखाशिर्ष | प्रत्यक्ष रकमा 2021-22 | सुधारीत अर्थसंकल्प 2022-23 | मुळ अंदाज 2023-24 |
|---|---|---|---|---|
| 1 | कर्मचारी वेतन भत्ते खर्च | 7037.08 | 8566.98 | 11003.02 |
| 2 | अस्थायी आस्थापना खर्च | 0.00 | 20.00 | 35.00 |
| 3 | ठेका आस्थापना खर्च | 8577.01 | 10181.65 | 14017.41 |
| 4 | सामान्य प्रशासन व इतर कार्यालयीन खर्च | 1924.34 | 8884.84 | 11298.51 |
| 5 | कर्मचाऱ्यांसाठी इतर खर्च | 2693.16 | 4655.30 | 4516.01 |
| 6 | नगर रचना खर्च | 775.91 | 905.89 | 2105.00 |
| 7 | परतावे | 90.50 | 287.67 | 372.35 |
| 8 | सदस्यांसाठी खर्च | 2.11 | 25.05 | 585.00 |
| 9 | उद्यान विकास खर्च | 414.42 | 463.71 | 4050.05 |
| 10 | दिवाबत्ती व्यवस्था खर्च | 2415.80 | 6400.26 | 12457.26 |
| 11 | मोकाट जनावरांचा बंदोबस्त | 95.83 | 42.51 | 671.55 |
| 12 | अग्निशमन व्यवस्था | 1543.89 | 2241.92 | 11445.00 |
| 13 | शहर स्वच्छता खर्च | 16693.81 | 21446.96 | 24430.00 |
| 14 | रुग्णालय व्यवस्था खर्च | 4811.56 | 4924.00 | 11382.21 |
| 15 | सांस्कृतिक भवन व्यवस्था खर्च | 0.00 | 26.25 | 300.26 |
| 16 | आपत्ती नियंत्रण खर्च | 1028.96 | 411.00 | 794.96 |
| 17 | दहन दफन भुमी व्यवस्था खर्च | 693.25 | 1128.51 | 2003.60 |
| 18 | क्रिडांगण व्यवस्था | 492.80 | 1962.83 | 4200.00 |
| 19 | मार्केट व्यवस्था खर्च | 0.00 | 31.37 | 901.00 |
| 20 | तलाव व्यवस्थापन खर्च | 318.96 | 1071.73 | 4290.22 |
| 21 | विकास कामांवरील खर्च | 21763.95 | 52234.51 | 81444.98 |
| 22 | शालेय शिक्षण व्यवस्था खर्च | 168.10 | 897.80 | 981.17 |
| 23 | वाचनालय व्यवस्था | 5.31 | 38.53 | 308.25 |
| 24 | सामाजिक कार्यक्रम खर्च | 1116.03 | 3601.10 | 6280.27 |
| 25 | उड्डाणपुल व्यवस्थापन खर्च | 0.00 | 104.51 | 1175.00 |
| 26 | इतर खर्च | 285.60 | 1478.64 | 4804.19 |
| 27 | पाणी पुरवठा व्यवस्थापन | 10557.51 | 20934.21 | 31362.79 |
| 28 | सुरक्षा व्यवस्था | 0.00 | 100.50 | 200.50 |
| 29 | मुख्य नाले खोदाई | 539.35 | 1757.00 | 1500.00 |
| 30 | पर्यावरण संरक्षण | 0.00 | 29.41 | 100.00 |
| 31 | परिवहन सेवा खर्च | 3947.94 | 8000.00 | 4200.00 |
| 32 | वनीकरण खर्च | 575.32 | 1334.44 | 2556.20 |
| 33 | इतर असाधारण खर्च | 17345.88 | 17940.55 | 21807.77 |
| | एकूण खर्च | 105914.38 | 182129.63 | 277579.53 |
| | अखेरची शिल्लक | 109760.94 | 85660.12 | 501.64 |
| | अखेरची शिल्लकसह एकूण | **215675.32** | **266087.87** | 278081.17 |